I.I.F.-I (एकीकृत अन् वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 173 B.N.S.S)**

## प्रथम खबर अहवाल

**(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)**

1. **District (जिल्हा):** सोलापुर ग्रामीण **P.S. (पोलीस ठाणे):** पंढरपूर शहर **Year (वर्ष):** 2025

**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0765 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 09/12/2025 04:43 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):**

1 **Day (दिवस):** सोमवार **Date from (दिनांक पासून):** 08/12/2025 **Date To (दिनांक पर्यंत):** 08/12/2025

**Time Period (कालावधी):** **Time From (वेळेपासून):** 15:27 तास **Time To (वेळेपर्यंत):** 18:18 तास

(b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 09/12/2025 **Time (वेळ):** 04:00 तास

(c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 009 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 09/12/2025 04:43 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** दक्षिण, 1 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** रायगड भवन,, पंढरपूर तहसिल कार्यालयाच्या , पाठीमागे व सोमनाथ टी कन्टीन,, माळशिरस रोड, इसबावी पंढरपूर,पंढरपूर

**(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (State) (जिल्हा (राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):**

**(a)** **Name (नाव):** रविंद्र हिम्मत लांभाते

**(b)** **Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):**

**(c)** **Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष):** 1987 **(d) Nationality (राष्‍ट्रीयत्‍व):** भारत

**(e)** **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f)** **Passport No. (पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख ):** **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g)** **ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))**

| **S. No. (अ.क्र.)** | **ID Type (ओळखपत्राचा प्रकार)** | **ID Number (ओळखपत्र क्रमांक)** |
|---|---|---|

**(h)** **Occupation (व्यवसाय):**

**(i)** **Address (पत्ता):**

| **S.No. (अ.क्र.)** | **Address Type (पत्ता प्रकार)** | **Address (पत्ता)::** |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पोलीस निरीक्षक, लाचलुचपत , प्रतिबंधक विभाग सोलापूर, पंढरपूर शहर , सोलापुर ग्रामीण, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | पोलीस निरीक्षक, लाचलुचपत , प्रतिबंधक विभाग सोलापूर, पंढरपूर शहर , सोलापुर ग्रामीण, महाराष्ट्र, भारत |

**(j)** **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल क्र.):** 91-7038401100

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

7. **Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | दिलीप दिगंबर सरवदे | | | 1. 14,सुजय नगर,वाघ,यांच्या घरी भाड्याने,Town/Village (शहर / गाव): अकलूज,Tehsil (तहसील): माळशिरस,Police Station (पोलीस ठाणे): अकलुज,District (जिल्हा): सोलापुर ग्रामीण,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |
| 2 | तुकाराम आसबे | | | 1. Town/Village (शहर / गाव): पुर्ण नाव व पत्ता माहित नाही,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): पंढरपूर शहर,District (जिल्हा): सोलापुर ग्रामीण,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| | | | | |

10. **Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :**

11. **Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

**I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)**

| **S. No. (अ.क्र.)** | **UIDB Number (यु.आय.डी.बी.)** |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

फिर्याद दि.09/12/2025

मी रविंद्र हिम्मत लांभाते, वय - 38 वर्षे, व्यवसाय नोकरी, पद-पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सोलापूर मो. नं. 7038401100 समक्ष फिर्याद देतो की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सोलापूर युनिट येथे माहे ऑगस्ट 2025 पासून पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत आहे.

दि.18/11/2025 रोजी आम्ही कार्यालयात असताना व श्री प्रशांत चौगुले, पोलीस उपअधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर यांनी आम्हास त्यांचे कक्षामध्ये बोलावून घेतले आणि तक्रारदार श्री सुर्यकांत मुरलीधर रोंगे, रा. खर्डी, ता. पंढरपूर, जि. सोलापूर यांनी फोन करून त्यांचेकडे होत असलेल्या लाच मागणीबाबत तक्रार दिली असून त्याअनुषंगाने पडताळणी करून पुढील कारवाई करणेबाबत आम्हाला तोंडी आदेश दिले. त्यानुसार आम्ही तात्काळ आमचेकडील अंमलदार यांचे मार्फत सोलापूर महानगरपालिका, सोलापूर या कार्यालयास 13.15 वा चे सुमारास पंच मिळणेबाबत पत्रव्यवहार करून दोन शासकिय पंच उपलब्ध करून घेतले. सुमारे 14.15 वा चे सुमारास 1) संदेश येसय्या गंदम, पद – कनिष्ठ श्रेणी लिपिक, मालमत्ता कर विभाग व 2) सागर सायबण्णा करगुळे, पद -कनिष्ठ श्रेणी लिपिक, मालमत्ता कर विभाग हे दोन्ही पंच साक्षीदार ला.प्र.वि सोलापूर या कार्यालयात आमच्या समक्ष हजर झाले. त्यावेळी मी दोघा पंचांना माझी ओळख सांगुन तक्रारदार श्री सुर्यकांत मुरलीधर रोंगे यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पंढरपूर येथे जाऊन पडताळणी व पुढील कारवाई करणेकामी पंच म्हणून उपस्थित राहून काम करणेस तयार आहात का? अशी विचारणा करता, दोन्ही पंच साक्षीदार यांनी पंच म्हणून काम करण्यास त्यांची संमती दिली. त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांची श्री प्रशांत चौगुले, पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि सोलापूर यांचेशी ओळख करून दिली. त्यानंतर आम्ही आमच्या कार्यालयातील पोहेकॉ/71 सोनवणे, पोहेकॉ/1616 जाधव, पोकॉ/766 किणगी, पोकॉ/862 पवार आणि दोन्ही शासकीय वाहनाचे चालकांना बोलावून घेतले आणि दोन्ही पंचांची ओळख करून देऊन गोपनीय कामकाजासाठी बाहेर जायचे असल्याचे सांगुन त्याकरीता आवश्यक सर्व साहित्य शासकीय वाहनात घेण्यास सांगितले. त्यानुसार गोपनीय कामाकरीता आवश्यक व्हाईसरेकॉर्डर, मेमरीकार्ड, लॅपटॉप, प्रिंटर, सील, अल्ट्रा व्हायोलेट दिवा.

. सर्व साहित्य ला.प्र.वि कडील शासकीय वाहन एम.एच.12 यु.सी 4098 व एम.एच 12 यु.सी 4108 या दोन वाहनामध्ये ठेवण्यात आले. त्यानंतर 14.30 वा एम.एच.12 यु.सी 4098 या वाहनातून पोलीस उपअधीक्षक श्री प्रशांत चौगुले, पोहेकॉ/71 सोनवणे, पोहेकॉ/1616 जाधव व चालक पोकॉ/2026 श्रीराम आणि एम.एच 12 यु.सी 4108 या वाहनातून मी, पोकॉ/766 किणगी, पोकॉ/862 पवार, दोन्ही पंच आणि चालक पोहेकॉ/894 गायकवाड असे आम्ही पंढरपूरकडे रवाना झालो. आम्ही मंगळवेढा बायपास मार्गे 15.50 वा चे सुमारास गोपाळपूर येथील विष्णूपद मंदिराजवळील मोकळ्या मैदानात जाऊन थांबलो. दरम्यानच्या काळात आम्ही तक्रारदार रोंगे यांना गोपाळपूर येथील विष्णूपद मंदिरजवळ येऊन थांबण्यास सांगितले होते. सदरठिकाणी गेल्यानंतर आम्ही अंमलदारांना वाहनातून

उतरवून बाहेर थांबण्यास सांगितले. त्याप्रमाणे सर्व अंमलदार हे वाहनातून उतरून बाहेर थांबल्यानंतर आम्ही तक्रारदार रोंगे व दोन्ही पंचासह पोलीस उपअधीक्षक चौगुले हे बसलेल्या शासकीय वाहनात गेलो. त्याठिकाणी तक्रारदार रोंगे यांची पोलीस उपअधीक्षक चौगुले, दोन्ही शासकीय पंच व आमची ओळख करून दिल्यानंतर आम्ही त्यांना पंचासमक्ष त्यांचे नाव पत्ता व त्यांची तक्रारीबाबत थोडक्यात हकीकत विचारली असता त्यांनी त्यांचे नाव श्री. सुर्यकांत मुरलीधर रोंगे, वय 46 वर्षे, व्यवसाय-शेती व व्यापार, रा. मु.पो. खर्डी, ता. पंढरपूर, जि. सोलापूर असे असल्याचे सांगून, त्यांचे मौजे खर्डी येथील गट नं.1066/1 याठिकाणी त्यांचे व त्यांच्या पत्नीच्या नावे असलेले शेतजमीन बिनशेती करण्याकरीता त्यावर भूसंपादन नसलेबाबतचा दाखला आवश्यक असल्याने तसा दाखला मिळणेकरीता त्यांनी उपविभागीय अधिकारी, पंढरपूर यांच्या कार्यालयात अर्ज दिला होता. सदर अर्जाची चौकशी होऊन अहवाल देण्याकरीता अर्ज तहसिल कार्यालय पंढरपूर यांच्या मार्फतीने खर्डीचे मंडल अधिकारी श्री दिलीप सरवदे यांच्याकडे प्राप्त झाला होता. त्यानंतर मंडल अधिकारी श्री सरवदे यांनी काढलेल्या नोटिशीच्या अनुषंगाने तक्रारदार हे त्यांचेसमक्ष हजर राहून सर्व कागदपत्रांची पुर्तता केली असता, त्यांनी चौकशी करून भूसंपादन नसलेबाबतचा अहवाल तहसिल कार्यालयाकडे पाठविण्यासाठी 50,000/- रू लाचेची मागणी करून तडजोडीवरून 25,000/- रू लाच मागणी केली होती, त्यावेळी तक्रारदार यांनी नाईलाजाने त्यांच्याकडे असलेले 5000/- रू त्यांना देऊन उर्वरित रक्कम नंतर देतो असे सांगितले होते. त्यानंतर तक्रारदार हे त्यांच्या कामाबाबत पाठपुरावा करीत असताना मंडल अधिकारी श्री सरवदे यांनी तक्रारदार यांचे काम करून देण्यासाठी 20,000/- रू लाच मागणी करून सदर लाच रक्कम त्यांच्या कार्यालयातील खाजगी इसम श्री तुकाराम आसबे यांच्याकडे देण्यास सांगितले. त्यानंतर दि.18/11/2025 रोजी तक्रारदार रोंगे यांनी 12.00 चे सुमारास त्यांचे मोबाईल क्रमांक 9860321139 यावरून मंडल अधिकारी श्री सरवदे यांना फोन केला असता त्यांनी लाच रक्कम 20,000/- रू घेऊन दुपारी येण्यास सांगितले असलेबाबत थोडक्यात हकीकत सांगितली. त्यानंतर त्यांना सदरची तक्रार त्यांचे स्व:हस्ताक्षरात लिहुन देण्यास सांगितली असता तक्रारदार यांनी त्यांची सविस्तर तक्रार स्व:हस्ताक्षरामध्ये लिहुन दिली. त्यानंतर सदरची तक्रार आम्ही व दोन्ही शासकीय पंचांनी वाचून त्यावर सहया केल्या.

मंडल अधिकारी श्री दिलीप सरवदे यांनी तक्रारदार यांना दि.18/11/2025 रोजी दुपारच्या सुमारास लाच रक्कम घेऊन त्यांचे कार्यालयात बोलावल्याने त्यांची लाच मागणीच्या अनुषंगाने पडताळणी कारवाई करण्याकरिता आम्ही, तक्रारदार श्री रोंगे व दोन्ही पंच साक्षीदार यांना आमचेकडील व्हाईस रेकॉर्डर व पॅकिंग मधील 08 जीबी चे नवीन मेमरीकार्ड दाखवुन त्यांचा वापर व उपयोग समजावून सांगितला. सदर पडताळणीकरीता पंच क्र.1 म्हणून श्री संदेश येसय्या गंदम व पंच क्र.2 म्हणून श्री सागर सायबण्णा करगुळे हे काम पाहण्याचे सर्वानुमते ठरले. त्यानंतर तक्रारदार रोंगे व दोन्ही पंचांचे निवेदन घेण्यासाठी आम्ही व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ईव्हिएम कंपनीचे नवीन सिलबंद मेमरीकार्ड पाकिटातून बाहेर काढून व्हॉईस रेकॉर्डरमध्ये घातले आणि व्हॉईस रेकॉर्डर चालू करून त्याचे इनबिल्ट मेमरीमध्ये व मेमरीकार्डमध्ये यापुर्वीची कोणतीही फाईल नसल्याचे तक्रारदार व दोन्ही पंचांची खात्री करून दिली.

त्यानंतर तक्रारदार रोंगे व दोन्ही शासकीय पंचांचे पडताळणी निवेदन घेतले. ती वेळ 16:22 वा ची होती. त्यानंतर आम्ही उपस्थित पंच साक्षीदार व तक्रारदार यांना पुढील पडताळणी कार्यवाहीचे

अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या व व्हाईस रेकॉर्डर 16.28 वा चालू करून तो तक्रारदार रोंगे यांचे शर्टाच्या आत असलेले बनीयनच्या आतील बाजूस गळयात अडकावून तक्रारदार रोंगे व पंच क्र.1 गंदम यांना तक्रारदार रोंगे यांचे काळ्या रंगाचे होन्डा युनिकॉर्न, रजि. क्र. एम.एच 13, सी.डी 0342 यावरून मंडल अधिकारी यांचे कार्यालय रायगड भवन, पंढरपूर तहसिल कार्यालयाच्या पाठीमागे, पंढरपूर येथे रवाना केले. सदरवेळी आम्ही, पोलीस उपअधीक्षक श्री चौगुले, पंच क्र.2 करगुळे व सर्व अंमलदार गोपाळपूर येथील विष्णूपद मंदिराजवळील मोकळ्या मैदानात थांबून राहिलो.

त्यानंतर काही वेळाने तक्रारदार रोंगे व पंच क्र.1 गंदम हे दोघे गोपाळपूर येथील विष्णूपद मंदिराजवळील मोकळ्या मैदानात आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले. त्यावेळी आम्ही तक्रारदार यांचे गळयातील व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केला ती वेळ 16:49 वा. ची होती. त्यानंतर आम्ही पंच क्र.1 गंदम यांना गेल्यापासुन येईपर्यंत काय झाले ते आमच्या समक्ष पंच क्र.2 करगुळे यांना सांगा असे सांगीतले. त्यावेळी त्यांनी सांगितले की, मी व तक्रारदार रोंगे दोघे तक्रारदार यांचे दुचाकीवरून रायगड भवन येथे गेलो. त्यावेळी मंडल अधिकारी रोंगे हे त्याठिकाणी दिसून न आल्याने तक्रारदार रोंगे यांनी त्यांचे मो.क्र.9860321139 यावरून मंडल अधिकारी सरवदे यांचे मो.क्र.8421978996 यावर फोन केला आणि त्यांचे फोन स्पिकरवर ठेवले. त्यावेळी तक्रारदार रोंगे यांनी त्यांना कार्यालयात आल्याचे सांगितले असता मंडल अधिकारी सरवदे यांनी कामानिमित्त बाहेर आलो असे सांगितले. त्यावर तक्रारदार रोंगे यांनी उद्या येऊ का? असे विचारले असता मंडलअधिकारी सरवदे यांनी ठिक आहे असे सांगुन उदईकरोजी येण्यास सांगितले, त्यामुळे आम्ही परत आलो अशी हकिकत सांगितली.

त्यानंतर आम्ही तक्रारदार रोंगे यांना घडलेल्या हकिकतीबाबत विचारले असता त्यांनीदेखील पंच क्र.1 गंदम यांच्याप्रमाणे घडलेली हकिकत सांगितली. त्यानंतर आम्ही व्हाईसरेकॉर्डर लॅपटॉपला लावून झालेले संभाषण दोन्ही पंच व तक्रारदार यांनी ऐकले असता ते पंच क्र.1 गंदम व तक्रारदार रोंगे यांनी वर सांगितलेल्या प्रमाणे संभाषण झाल्याचे निष्पन्न झाले. एकंदरीत दि.18/11/2025 रोजी करण्यात आलेल्या पडताळणीवेळी मंडल अधिकारी सरवदे हे कार्यालयात हजर नसल्याने आणि त्यांनी तक्रारदार यांना उद्या या असे सांगितले असल्याने दि.18/11/2025 रोजीची कारवाई स्थगित करण्यात आले. त्यानंतर तक्रारदार रोंगे यांचा जबाब नोंदवून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सोलापूर या कार्यालयात आम्ही परत आलो आणि त्याठिकाणी सविस्तर पडताळणी पंचनामा करण्यात आला. त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांना दि.19/11/2025 रोजी 10.30 वा. कार्यालयात हजर राहण्याच्या सुचना दिल्या.

दि.19/11/2025 रोजी 10.30 वा चे सुमारास दोन्ही पंच हे कार्यालयात उपस्थित झाल्यानंतर पोलीस उपअधीक्षक श्री प्रशांत चौगुले, आम्ही, दोन्ही शासकीय पंच आणि पोना/30 नरोटे, पोकॉ/766 किणगी, चालक पोहेकॉ/984 गायकवाड असे सर्वजण गोपनीय कामकाजाकरीता आवश्यक सर्व साहित्य सोबत घेऊन एम.एच.12 यु.सी 4108 यामधून 11.20 वा चे सुमारास पंढरपूरकडे रवाना झालो. आम्ही मंगळवेढा बायपासमार्गे 12.40 वा चे सुमारास गोपाळपूर येथील विष्णूपद मंदिराजवळील मोकळ्या मैदानात पोहोचलो. त्यावेळी तक्रारदार रोंगे हे त्यांचे दुचाकीसह सदरठिकाणी येऊन थांबलेले होते. त्यानंतर आम्ही तक्रारदार व दोन्ही पंचांना तक्रारदार रोंगे यांची तक्रार व

त्याअनुषंगाने दि.18/11/2025 रोजी झालेल्या पडताळणीची थोडक्यात उजळणी करून दिली. मंडल अधिकारी सरवदे यांनी तक्रारदार यांना दि.19/11/2025 रोजी बोलावले असल्याने त्यांची पडताळणी करण्याचे ठरविले. त्यानंतर आम्ही तक्रारदार व दोन्ही पंचांना व्हाईसरेकॉर्डर व दि.18/11/2025 रोजी वापरण्यात आलेले मेमरीकार्ड दाखवून त्याची माहिति दिली. सदर मेमरीकार्डमध्ये दि.18/11/2025 रोजीचे पडताळणीवेळी रेकॉर्ड करून घेण्यात आलेले पडताळणी निवेदनाचे एक फाईल आणि पडताळणीवेळी तक्रारदार रोंगे आणि मंडल अधिकारी सरवदे यांच्यामध्ये झालेले संभाषणाची एक फाईल असे दोन फाईल्स असल्याचे तक्रारदार आणि पंचांची खात्री करून दिली. त्यानंतर 13.18 वा चे सुमारास तक्रारदार रोंगे व दोन्ही पंचांचे पडताळणीपुर्व निवेदन व्हाईसरेकॉर्डरच्या साहायाने रेकॉर्ड करून घेण्यात आले. त्यानंतर तक्रारदार रोंगे व दोन्ही पंचांना पडताळणीच्या अनुषंगाने सर्व त्या सुचना देऊन व्हाईस रेकॉर्डर 13.24 वा चालू करून तो तक्रारदार रोंगे यांचे शर्टाच्या आत असलेले बनीयनच्या आतील बाजूस गळयात अडकावून तक्रारदार रोंगे व पंच क्र.1 गंदम यांना तक्रारदार रोंगे यांचे मोटार सायकलवरून मंडल अधिकारी यांचे कार्यालय रायगड भवन, पंढरपूर तहसिल कार्यालयाच्या पाठीमागे, पंढरपूर येथे रवाना केले. सदरवेळी आम्ही, पोलीस उपअधीक्षक श्री चौगुले, पंच क्र.2 करगुळे व अंमलदार गोपाळपूर येथील विष्णूपद मंदिराजवळील मोकळ्या मैदानात थांबून राहिलो.

त्यानंतर काही वेळाने तक्रारदार रोंगे व पंच क्र.1 गंदम हे दोघे गोपाळपूर येथील विष्णूपद मंदिराजवळील मोकळ्या मैदानात आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले. त्यावेळी आम्ही तक्रारदार यांचे गळयातील व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केला, ती वेळ 15.33 वा. ची होती. त्यानंतर आम्ही पंच क्र.1 गंदम यांना गेल्यापासुन येईपर्यंत काय झाले ते आमच्या समक्ष पंच क्र.2 करगुळे यांना सांगा असे सांगीतले. त्यावेळी त्यांनी सांगितले की, “मी व तक्रारदार रोंगे दोघे मिळून तक्रारदार यांच्या मोटारसायकलवरून रायगड भवन येथे गेलो, त्याठिकाणी मंडल अधिकारी सरवदे आणि खाजगी इसम तुकाराम आसबे हे दिसून न आल्याने तक्रारदार रोंगे यांनी त्याठिकाणी उपस्थित एका इसमाकडे मंडल अधिकारी सरवदे यांच्याबाबत विचारणा केली. सदरवेळी त्या इसमाने भाऊसाहेब बाहेर गेलेत असे सांगितले. त्यानंतर तक्रारदार रोंगे यांनी त्यांचे मो.क्र. 9860321139 यावरून मंडल अधिकारी सरवदे यांचे 8421978996 यावर फोन केला आणि ऑफिसला आल्याचे सांगितले. त्यावेळी मंडल अधिकारी सरवदे यांनी एक अर्धा तासात येतो असे सांगितले. त्यावेळी तक्रारदार रोंगे यांनी बर बर.. ठिक हाय..ठिक हाय..चालतय थांबतो मग असे सांगुन फोन बंद केला. त्यानंतर आम्ही रायगड भवन येथेच थांबून राहिलो. साधारण अर्ध्या तासाच्या कालावधीनंतर मंडल अधिकारी सरवदे हे कार्यालयात आले. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांना पाहून नमस्कार..काय भेटच होईना दोघांची आपली असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार व मंडल अधिकारी सरवदे यांच्यामध्ये त्यांच्या कामकाजाबाबत चर्चा झाली. सदरवेळी तक्रारदार रोंगे यांनी काय झाल आपल साहेब…झाल का नाही प्रकरणाचा अहवाल तयार झाला काय असे विचारले असता मंडल अधिकारी सरवदे यांनी ह्यात कायच केल नाही असे सांगितले. त्यावर तक्रारदार यांनी होय..बर..बर..बर..मला वाटल बघीतल असचाल तुम्ही म्हणल असे विचारले, त्यावर त्यांनी इन्स्पेक्शन करायच आहे असे सांगितले. त्यानंतर तक्रारदार यांनी मला वाटल..बर झाल..बघीतल असचाल म्हणल काम सुट्टीत..दिवाळीमध्ये आलो नाही..दिवाळी सुट्टीत असे बोलले असता सरवदे यांनी दिवाळीत.. आयला नाही काय असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी

तुम्ही म्हणले नाय का दिवाळीत बघुन ठेवतो सुट्टीला.. आसबेचा मगा आलता फोन मला, आलाये म्हणले ऑफिसला असे विचारले असता सरवदे यांनी आताच एवढ्यात जष्ट गेल्यात बाहेर..मी गेलो आणि माझ्या आगोदर एक दहा मिनीट ती गेले असे सांगितले. त्यानंतर तक्रारदार रोंगे आणि मंडल अधिकारी सरवदे यांच्यामध्ये त्यांच्या कामाबाबत चर्चा झाली. सदरवेळी मंडल अधिकारी सरवदे यांनी रोंगे यांच्या प्रकरणाची कागदपत्रे पाहून चर्चा केली. यादरम्यान मंडल अधिकारी सरवदे यांनी एक एक मिनिट असे म्हणून थोडे बाजूला गेले. त्यानंतर तक्रारदार रोंगे हे कार्यालयातील इसमासोबत त्यांच्या कामाबाबत चर्चा करत असताना त्यांनी त्यांचे मो.क्र. 9860321139 यावरून खाजगी इसम तुकाराम आसबे यांचे मो.क्र.9011279787 यावर फोन केला. त्यावेळी तक्रारदार यांनी आसबे सरकार या की..कुठाय? असे विचारले असता आसबे यांनी आओ मी इकड कोर्टात आलोय असे सांगितले. त्यानंतर आसबे यांनी द्या की त्यानला असे म्हणाले असता, तक्रारदार रोंगे यांनी बर बर ... तुम्ही किती वेळ लागेल तुम्हाला यायला असे विचारले परंतू त्यावेळी आसबे यांनी फोन बंद केला. त्यानंतर मंडल अधिकारी सरवदे हे आमच्याकडे येऊन ही कोण हायत असे म्हणून माझ्याबाबत विचारणा केली. त्यावेळी तक्रारदार यांनी ती आमचे मेव्हुणे आहेत..मिसचे भाऊ हायत..बघायला आलते त्यानला असे सांगितले. त्यानंतर काहीवेळ अवांतर संभाषण झाल्यानंतर तक्रारदार यांनी तुकाराम आसबेंना फोन केला परंतू त्यांनी फोन उचलला नाही. काहीवेळानंतर तुकाराम आसबे यांनी तक्रारदार यांच्या मोबाईलवर फोन केला. त्यावेळी तक्रारदार यांनी कधी येणार हाय इकड? असे आसबेंना विचारले. त्यावर त्यांनी यायला वेळ लागणार असल्याचे सांगितले. त्यावेळी खाजगी इसम आसबे यांनी संग कोण हाय तुमच्या? असे विचारले. त्यावर तक्रारदार यांनी कुठ कोण हाय असे विचारले असता त्यांनी पुन्हा कोण हाय का सांगा असे विचारले. त्यावर तक्रारदार यांनी नाय नाय ती मेव्हुणा हाय आमचा ओ..मेव्हुणा हाय माझ्याबरोबर अन ती तुमच साहेबांचा एक भाऊ आहे सरवदे.. आणि ते माझ्याबरोबर ती मेव्हुणा आलाय आमचा ओ असे सांगितले. त्यानंतर आसबे यांनी तक्रारदार यांनी दोन अडीच तासान या असे सांगितले. त्यानंतर तक्रारदार यांनी फोन ठेऊन मंडलअधिकारी सरवदे यांच्याशी चर्चा करून वेळ लागील म्हणतेत..काय मग..उद्या येऊ द्या का सांगा काय असे सरवदे यांना विचारले. त्यावर त्यांनी आदल्या दिवशीचे तारीख विचारून घेतले आणि ठिक हाय उद्या या तुम्ही असे सांगितले. तेव्हा तक्रारदार यांनी आपल लय दिवस झाल पेंडींग हाय असे म्हणाले असता सरवदे यांनी एक पंचनामा करू विषय आपला स्टॉप असे सांगितले. त्यानंतर काहीवेळ कामाबद्दल चर्चा झाल्यानंतर मी व तक्रारदार रोंगे पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलो" याप्रमाणे सविस्तर हकिकत सांगितले.

त्यानंतर आम्ही तक्रारदार रोंगे यांना ते पंचासह मंडल अधिकारी सरवदे यांना भेटण्यास गेल्यानंतर काय घडले याची हकिकत सांगण्यास सांगितले असता, त्यांनी देखील वरीलप्रमाणे घडलेली हकीकत सांगितली. त्यानंतर आम्ही व्हॉईसरेकॉर्डर लॅपटॉपला जोडून पाहिले असता, मेमरीकार्डमधील रेकॉर्डीग फाईलमधील संभाषण ऐकले असता वरीलप्रमाणे संभाषण झाल्याचे दिसून आले. सदर पडताळणीदरम्यान तक्रारदार व पंच क्र.1 हे दोघे मंडलअधिकारी सरवदे यांची भेट घेऊन चर्चा करताना खाजगी इसम तुकाराम आसबे यांनी फोनवरून तक्रारदार यांना संग कोण हाय तुमच्या? असे विचारून पंचाबाबत विचारणा केली. सदर पडताळणीवेळी तुकाराम आसबे हे त्या कार्यालयात उपस्थित नव्हते तरीदेखील त्यांना तक्रारदार यांच्यासोबत अन्य एक इसम सोबत आहे हे समजले

म्हणजेच मंडलअधिकारी सरवदे हे खाजगी इसम तुकाराम आसबे यांच्यासह मोबाईल फोन किंवा अन्य माध्यमातून संपर्कात असून त्यांनी तक्रारदार यांच्याबद्दल माहिती दिल्याची शक्यता असल्याचे दिसून आले.

त्यानंतर काहीवेळाने आम्ही सगळे विष्णूपद येथील मोकळ्या मैदानात असताना खाजगी इसम तुकाराम आसबे यांचे मो.क्र.9011279787 यावरून तक्रारदार रोंगे यांचे वर नमुद मोबाईल क्रमांकावर फोन आला. त्यावेळी आम्ही व्हॉईसरेकॉर्डर चालू करेपर्यंत फोन बंद झाल्याने तक्रारदार रोंगे यांनी तुकाराम आसबे यांना परत फोन केला आणि स्पीकर चालू ठेवला. त्यावेळी आम्ही व्हॉईसरेकॉर्डर चालू करून ते तक्रारदार रोंगे यांच्या मोबाईल समोर धरले. ती वेळ 16.11 वा. ची होती. सदरवेळी तुकाराम आसबे यांनी फोन उचलून हा दादा..डॉक्टर साहेब कुठ हाय ओ? असे विचारले. त्यावर तक्रारदार यांनी हा..हाय की पंढरपूरात बोला की असे म्हणाले. त्यावेळी आसबे यांनी बर बर आलो.. एक पंधरा मिनीटात आलो.. कचेरीत या.. पंधरा मिनीटात असे सांगितले. त्यानंतर तक्रारदार यांनी मग काय त्यांनी काय बोललेच नाहीत..कागदपत्र बघीतलेत सगळे..कागदपत्र असे बोलून मंडल अधिकारी सरवदे यांच्या भेटीवेळी लाच रकमेबाबत काही बोलले नसल्याचे सांगितले. त्यावर आसबे यांनी पर आता मला आल्याशिवट काय होत नाय ओ असे सांगितले. त्यानंतर तक्रारदार रोंगे यांनी नाय ऐका की..तुमच्या समोर पाच हजार रुपये दिलेतच त्यांना बरका असे सांगितले. त्यावर आसबे यांनी हा असे होकारार्थी उत्तर दिले. त्यानंतर तक्रारदार यांनी चर्चेदरम्यान आता तुमच्या समोर दिले पाच हजार..मग राहिलेले वीस हजार आपल्याला द्यायचे ठरले होतच त्यांना, पण मिसेस आजारी वैगेरे असल्यामुळे दवाखान्याला पैसे गेले माझे, त्यामुळे त्यांना लांबलय थोड पैसे द्यायचे..पण आता ती काय बोललेच नाही की पैशाचं असे म्हणाले. त्यावर आसबे यांनी आओ..ती तुम्हाला कसे बोलतेल.. मला बोलतेत असे सांगितले. त्यावर तक्रारदार यांनी आता तुम्ही फोन उचलला नाही म्हणुन त्यांनी तर बोलायला पाहिजे ना मला..की बाबा पैसे द्या असे म्हणाले असता, आसबे यांनी नाय नाय..नाय नाय..बोलत नसतेती डॉक्टर साहेब असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार यांनी आओ पण माझ ऐका की..जुलै महिन्यात फाईल गेलीय त्यांच्याकड आता नोव्हेंबर महिना चालुय चार चार महिन्यात तर मी एवढं हेलपाट घालून मी घाईला आलोय बघा..तुम्हाला माहिती हाय माझी किती पळापळ आहे असे म्हणाले असता, आसबे यांनी असूद्या.. तुमच एका तासात काम करतो असे सांगितले. त्यावर तक्रारदार यांनी मग काय करायच बोला की आता असे विचारले असता, तुकाराम आसबे यांनी मग आता या की.. तिथ पैसे घेऊन या की कचेरीपाशी असे सांगितले. त्यावर तक्रारदार यांनी कुठ म्हणजी नक्की कुठ येऊद्या असे विचारले असता, आसबे यांनी ती चहाच कॅन्टीन हाय तीथ या की..मी येतूय पंधरा मिनीटातच मी येतूय असे सांगितले. त्यानंतर तक्रारदार यांनी भेटण्याच्या जागेबद्दल थोडी चर्चा करून मग काय किती आणूद्या पैसे मग काय असे विचारले असता, तुकाराम आसबे यांनी ती ठरलेलं तेवढंच आणा असे बोलून स्पष्टपणे लाचेची मागणी केली. त्यावर तक्रारदार यांनी पुन्हा बर ऐका की.. किती? असे विचारले असता, तुकाराम आसबे यांनी वीस असे म्हणून ठरल्याप्रमाणे 20,000/- रू लाच रक्कम घेऊन येण्यास सांगितले. त्यावर तक्रारदार यांनी आयला वीस काय नाय बरका..ऐका की आपण पाच दिल्यात पहिल बरका..आता आपल्याकड पंधरा..पंधरा हजारच आपल्याकड हाय बरका..वीस काय नायत बरका..ऐका की असे बोलून लाच रक्कमेमध्ये तडजोड करण्याचा प्रयत्न केला असता आसबे यांनी बर आसूद्या पुन्हा राहिलेलं द्या

असे म्हणून 15,000/- रू घेऊन येण्यास सांगुन उर्वरित रक्कम नंतर देण्यास सांगितले. त्यानंतर आसबे यांनी वीस मिनिटानी या असे तक्रारदार यांना सांगुन फोन बंद केला. त्यानंतर आम्ही व्हॉईसरेकॉर्डर बंद केला.

सदर फोन कॉलवरील पडताळणीदरम्यान खाजगी इसम तुकाराम आसबे यांनी तक्रारदार यांना पैसे घेऊन रायगड भवन येथे येण्यास सांगितल्याचे स्पष्ट झाले. खाजगी इसम तुकाराम आसबे यांनी मंडल अधिकारी सरवदे यांच्याकरीता लाचेची मागणी केली आहे परंतू अद्याप मंडल अधिकारी सरवदे यांनी तक्रारदार यांच्याकडे लाचेची मागणी केली नाही अथवा आसबे यांच्या लाचमागणीला दुजोरा दिला नाही त्यामुळे मंडल अधिकारी सरवदे यांची पडताळणी करणे आवश्यक असल्याने त्यांची पडताळणी करण्यासाठी तुकाराम आसबे यांनी बोलावल्याप्रमाणे कार्यालयाजवळ जाऊन त्यांची भेट घेऊन त्यांच्यासोबत मंडल अधिकारी सरवदे यांच्याकडे जाऊन तक्रारदार रोंगे यांच्या कामासंदर्भात चर्चा करावी त्यावेळी मंडल अधिकारी सरवदे यांनी लाचेची मागणी केल्यास अथवा आसबे यांनी मागणी केलेल्या रकमेबाबत दुजोरा दिल्यास अथवा लाच रक्कम आसबे यांच्याकडे देण्यास सांगितल्यास थोड्यावेळात आणून देतो असे सांगुन परत यावे असे याप्रमाणे तक्रारदार रोंगे यांना सुचना दिल्या तसेच सदरवेळी पंच क्र.1 गंदम यांना तक्रारदार यांच्यासोबत हजर राहून लक्षपुर्वक पाहणी करण्यास सांगितले.

त्यानंतर आम्ही व्हॉईसरेकॉर्डर चालू करून तक्रारदार रोंगे यांचे शर्टाचे आतील बाजूस बनियानच्या आतमध्ये बाहेर दिसणार नाही याप्रमाणे गळयात अडकावून तक्रारदार यांना पंच क्र.1 गंदम यांच्यासह त्यांचे मोटारसायकलवरून 16.24 वाजता रवाना केले. सदरवेळी पोलीस उपअधीक्षक चौगुले, आम्ही, पंच क्र.2 व सर्व अंमलदार विष्णुपद मंदिराजवळील मैदानातच थांबून राहिले. काहीवेळाने तक्रारदार रोंगे व पंच क्र.1 गंदम हे दोघे पथक थांबलेल्या ठिकाणी परत आले. त्यावेळी आम्ही तक्रारदार रोंगे यांच्या गळयातील व्हॉईस रेकॉर्डर काढुन बंद करुन ताब्यात घेतला, ती वेळ सुमारे 16.50 वा.ची होती. त्यानंतर आम्ही पंच क्र.1 गंदम यांना तक्रारदार रोंगे यांचेसह मंडल अधिकारी सरवदे व खाजगी इसम तुकाराम आसबे यांची भेट घेण्याकरीता गेल्यानंतर काय घडले याबाबतची हकीकत आमचे व पंच क्र.2 करगुळे यांचेसमक्ष कथन करण्यास सांगितले असता त्यांनी सांगितले की, "मी व तक्रारदार रोंगे दोघे मिळून तक्रारदार यांच्या मोटारसायकलवरून पंढरपूर तहसिल कार्यालयाच्यासमोर रायगड भवनकडे जाणा-य रस्त्याजवळ गेलो. त्याठिकाणी गाडी थांबवून आम्ही गाडीवरून उतरलो असता, तुकाराम आसबे यांनी आम्हास पाहून तक्रारदार रोंगे यांना डॉक्टरसाहेब या की. तुमच्या तुम्ही एकट या असे बोलून मला तिथेच थांबवून तक्रारदार रोंगे यांना एकटेच येण्यास सांगितले. त्यावर तक्रारदार यांनी मला या की जरा असे बोलून त्यांच्यासोबत येण्यास सांगितले, त्यावर आसबे यांनी तुमच्या तुम्ही एकट या असे म्हणून पुन्हा तक्रारदार यांना एकट्यास बोलावले. त्यावेळी आसबे यांनी तक्रारदार यांच्याकडे माझ्याबाबत चौकशी केली. त्यावेळी तक्रारदार यांनी हे माणूस आपल ओ. मेहुणा हाय आमचा. पाहूणा हाय असे सांगितले. त्यावर आसबे यांनी तक्रारदार यांना बोलावून तेवढ्या माणसात कोण पैसे घेत नसतेती असे म्हणून करप्शनच्या गाड्या फिरतेत्या असे सांगितले. त्यानंतर आसबे यांनी तुम्हाला काय वाटल समोर वाटल नाही का काय असे विचारले. त्यावर तक्रारदार यांनी ते काय बोलले नाहीत की मला असे म्हणून मंडल अधिकारी सरवदे यांनी भेटीवेळी लाच रकमेबाबत बोलले नसल्याचे सांगितले. त्यावर आसबे यांनी

अहो बोलतील कस तुम्हाला. मला फोन आलेल असे सांगितले. त्यावर तक्रारदार यांनी काय म्हणले असे विचारले असता, आसबे यांनी मला फोन आल्यावर मग म्या तुम्हाला म्हणल नाही तुमच्या संग कोण हाय असे बोलून तक्रारदार यांना फोन करून माझ्याबाबत विचारणा केल्याचा उल्लेख केला. त्यानंतर आसबे यांनी तक्रारदार यांना बर चला असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार यांनी कुठ साहेबाकड? असे विचारले असता आसबे यांनी हा म्हणाले. त्यावेळी तक्रारदार रोंगे यांनी येऊ द्या की त्यांना दोन मिनिट काय त्याला असे बोलून मला त्यांच्यासोबत नेण्याचा आग्रह केला. त्यावेळी आसबे यांनी नको नको असे म्हणाले. सदरवेळी मला सोबत घेण्याचा तक्रारदार यांचा आग्रह पाहून आसबे यांना संशय बळावल्याने त्यांनी नको नको नको नको. मग पैसे देऊच नका. तुमच्या पाया पडतो असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी हसत काय खर नाय असे बोलले असता, आसबे यांनी नको मग पैसे असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी काम तर करायला सांगा त्यांना. पैसे नको तर काम तर करायला सांगा असे सांगितले असता, आसबे यांनी काम करायला सांगतो पण पैसे नको असे म्हणाले. यादरम्यान चर्चेवेळी तुकाराम आसबे यांनी तक्रारदार रोंगे यांना एकटेच चला असे म्हणत होते परंतू तक्रारदार रोंगे यांनी मला सोबत घेण्याचा आग्रह केल्याने त्यांना संशय बळावल्याने ते पैसे नको असे सांगुन तुमचे काम करायला सांगतो असे सांगितले त्यामुळे आम्ही पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलो" याप्रमाणे सविस्तर हकिकत सांगितले.

त्यानंतर आम्ही तक्रारदार रोंगे यांना ते पंचासह मंडल अधिकारी सरवदे यांना भेटण्यास गेल्यानंतर काय घडले याची हकिकत सांगण्यास सांगितले असता, त्यांनी देखील वरीलप्रमाणे घडलेली हकीकत सांगितली. त्यानंतर आम्ही व्हॉईसरेकॉर्डर लॅपटॉपला जोडून पाहिले असता, मेमरीकार्डमधील रेकॉर्डींग फाईलमधील संभाषण ऐकले असता वरीलप्रमाणे संभाषण झाल्याचे दिसून आले. सदर पडताळणीदरम्यान खाजगी इसम तुकाराम आसबे यांनी तक्रारदार रोंगे यांना मंडल अधिकारी सरवदे यांची भेट घेण्यासाठी घेऊन जाताना तक्रारदार यांचा पंच क्र.1 गंदम यांना सोबत घेण्याचा आग्रह पाहून तुकाराम आसबे यांना संशय बळावल्याने त्यांनी तक्रारदार रोंगे यांना मंडल अधिकारी सरवदे यांच्या भेटीसाठी घेऊन जाण्यास नकार दिल्याचे स्पष्ट झाले. एकंदरीत दि.19/11/2025 रोजी करण्यात आलेल्या पडताळणीदरम्यान मंडल अधिकारी सरवदे यांनी तक्रारदार यांना अहवाल तयार करून उद्या देतो उद्या या असे सांगितले होते, मंडल अधिकारी सरवदे किंवा तुकाराम आसबे हे त्यांची शंका कमी झाल्यानंतर पुन्हा तक्रारदार यांना फोन करून लाच रक्कम घेऊन येण्यास सांगतील अशी शक्यता असल्याने त्यांच्याकडून बोलावणे आल्यास पुढील कारवाई करण्याचे ठरवून दि.19/11/2025 रोजीची पडताळणी कारवाई स्थगित करण्यात आले. त्यानंतर तक्रारदार रोंगे यांचा जबाब नोंदवून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सोलापूर या कार्यालयात आम्ही परत आलो आणि त्याठिकाणी सविस्तर पडताळणी पंचनामा करण्यात आला. त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांना तक्रारदार यांचे फोन आल्यानंतर कळविण्यात येईल तेव्हा हजर राहण्याच्या सुचना दिल्या.

त्यानंतर दि.08/12/2025 रोजी तक्रारदार रोंगे यांनी पोलीस उपअधीक्षक श्री प्रशांत चौगुले यांना फोन करून त्यांचे काम अद्याप पुर्ण झाले नसून त्याचा पाठपुरावा करण्यासाठी ते मंडल अधिकारी सरवदे यांची भेट घेण्यासाठी जाणार आहेत, यादरम्यान ते माझ्याकडे लाचेची मागणी करण्याची शक्यता आहे असे सांगितले. त्यावरून पोलीस उपअधीक्षक श्री चौगुले यांनी मला बोलावून तक्रारदार रोंगे यांच्या तक्रारीवर पुढील कारवाई करण्यास आदेश दिले. त्यावरून आम्ही पंच क्र.1 गंदम व पंच क्र.2

करगुळे यांना उपस्थित ठेवण्याबाबत सोलापूर महानगरपालिकेस पत्रव्यवहार केले. त्यावरून 12.30 वा चे सुमारास दोन्ही पंच ला.प्र.वि कार्यालयात आमच्या समक्ष हजर झाले. त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांना तक्रारदार रोंगे यांच्या निरोपाबाबत माहिती देऊन पुढील कारवाईकरीता पंढरपूर येथे जायचे असल्याबाबत सांगितले. त्यानंतर पोलीस उपअधीक्षक श्री प्रशांत चौगुले, आम्ही, दोन्ही शासकीय पंच आणि पोना/30 नरोटे, पोकॉ/766 किणगी, चालक पोहेकॉ/984 गायकवाड असे सर्वजण गोपनीय कामकाजाकरीता आवश्यक सर्व साहित्य सोबत घेऊन एम.एच.12 यु.सी 4108 यामधून 13.30 वा चे सुमारास पंढरपूरकडे रवाना झालो. आम्ही मंगळवेढा बायपासमार्गे 14.40 वा चे सुमारास गोपाळपूर येथील विष्णूपद मंदिराजवळील मोकळ्या मैदानात पोहोचलो. दरम्यान आम्ही तक्रारदार रोंगे यांना सदरठिकाणी येण्यास कळविलेवरून ते 14.50 वा चे सुमारास त्याठिकाणी आले. त्यानंतर आम्ही तक्रारदार व दोन्ही पंचांना तक्रारदार रोंगे यांची तक्रार व त्याअनुषंगाने दि.18/11/2025 व दि.19/11/2025 रोजी झालेल्या पडताळणीची थोडक्यात उजळणी करून दिली.

तक्रारदार रोंगे हे त्यांच्या कामाचे पाठपुरावा करण्यासाठी मंडल अधिकारी सरवदे यांची भेट घेण्यासाठी जाणार असल्याने त्यांची पडताळणी करण्याचे ठरविले. त्यानंतर आम्ही तक्रारदार व दोन्ही पंचांना व्हाईसरेकॉर्डर व ईव्हीएम कंपनीचे 08 जी.बी चे नवीन मेमरीकार्ड दाखवून त्याची माहिती दिली आणि सदर मेमरीकार्डमध्ये व व्हाईसरेकॉर्डच्या इनबिल्ट मेमरीकार्डमध्ये कोणतेही फाईल नसल्याचे खात्री करून दिली. त्यानंतर 15.20 वा चे सुमारास तक्रारदार रोंगे व दोन्ही पंचांचे पडताळणीपुर्व निवेदन व्हाईसरेकॉर्डरच्या साहायाने रेकॉर्ड करून घेण्यात आले. सदरवेळी तक्रारदार व दोन्ही पंचांचे निवेदन घेताना मोबाईलद्वारे व्हिडीओ चित्रीकरण करण्यात आले. त्यानंतर तक्रारदार रोंगे व दोन्ही पंचांना पडताळणीच्या अनुषंगाने सर्व त्या सुचना देऊन व्हाईस रेकॉर्डर 15.27 वा चालू करून तो तक्रारदार रोंगे यांचे शर्टाच्या आत असलेले बनीयनच्या आतील बाजूस गळयात अडकावून तक्रारदार रोंगे व पंच क्र.1 गंदम यांना तक्रारदार रोंगे यांचे वर नमुद मोटारसायकलवरून रायगड भवन येथे रवाना केले. सदरवेळी आम्ही, पोलीस उपअधीक्षक श्री चौगुले, पंच क्र.2 करगुळे व अंमलदार गोपाळपूर येथील विष्णूपद मंदिराजवळील मोकळ्या मैदानात थांबून राहिलो.

त्यानंतर काही वेळाने तक्रारदार रोंगे व पंच क्र.1 गंदम हे दोघे गोपाळपूर येथील विष्णूपद मंदिराजवळील मोकळ्या मैदानात आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले. त्यावेळी आम्ही तक्रारदार यांचे गळयातील व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केला, ती वेळ 17.10 वा. ची होती. त्यानंतर आम्ही पंच क्र.1 गंदम यांना गेल्यापासुन येईपर्यंत काय झाले ते आमच्या समक्ष पंच क्र.2 करगुळे यांना सांगा असे सांगितले. त्यावेळी त्यांनी सांगितले की, मी व तक्रारदार रोंगे दोघे तक्रारदार रोंगे यांच्या मोटारसायकलवरून रायगड भवन येथे गेलो. त्यावेळी मंडल अधिकारी सरवदे यांच्यासमोर इतर काही इसम हे त्यांच्या कामानिमित्त बसले होते त्यामुळे आम्ही तिथे बसून त्यांच्या जाण्याची वाट पाहिली. मंडल अधिकारी सरवदे यांच्यासमोरील सर्व इसम बाहेर गेल्यानंतर मंडल अधिकारी सरवदे यांनी काय म्हणताय डॉक्टर असे म्हणून संभाषणास सुरूवात केली. त्यावर तक्रारदार यांनी काय नाय बघा.. कामात हाय? असे त्यांना विचारले. त्यावेळी मंडल अधिकारी यांनी जेवण करायचय असे सांगितले. यादरम्यान काही इसम हे त्यांच्या कामानिमित्त मंडल अधिकारी यांच्याकडे आले त्यामुळे आम्ही त्यांच्या जाण्याची वाट पाहिली. मंडल अधिकारी सरवदे यांच्याकडे आलेले सर्व इसम गेल्यानंतर तक्रारदार यांनी मग साहेब तुमच काम होत म्हणून बोललो नाही काय.. म्हणल जरा

डिस्टर्ब उग.. काय लय दिवस पेंडींग काम होत म्हणल.. असे म्हणले आणि त्यानंतर आपल्या फाईलच अहवाल तयार झाल का? तयार केला का? असे विचारले. त्यावर त्यांनी तुम्ही सोलापूरला गेलते? असे विचारून हाताच्या इशाऱ्याने लाचेची मागणी केली. त्यावर तक्रारदार यांनी गेलतो ते नाय म्हणले. आपल्याकडच रेकॉर्ड हाय म्हणले ओ. गेलतो मी सोलापूरला.. ती म्हणले इथ आपल्याकडच रेकॉर्ड हाय म्हणले. जाऊद्या आपल ह्योका ठरल्याप्रमाणे दिवाळीच्या अगोदर पाच हजार रूपये दिलेत आता वीस हजार तुम्हाला द्यायचे राहिलेत. देऊन टाकतो. विषय संपवून टाका आमच लय दिवस पेंडींग हाय. तुमच्या म्हणण्याप्रमाणे करू असे सांगितले. त्यावर मंडल अधिकारी सरवदे यांनी बर ठिक हाय असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार रोंगे यांनी मी एक.. मला थोडासा वेळ द्या मी लगेच येतो मी मित्राकडून घेऊन.. अजून अर्धा तास हाय का तुम्ही.. ठरल्याप्रमाणे तुम्हाला वीस देतो की असे म्हणाले. त्यावर मंडल अधिकारी सरवदे यांनी एवढा वेळ झाल कसकाय? असे म्हणून लाच रक्कम देण्यास बराच कालावधी झाल्याने त्यांची नाराजी दर्शविली. त्यावेळी तक्रारदार यांनी आमच्या मिसेस आजारी होते त्यामुळे जरा वेळ लागला दवाखान्यात जरा पैसे गेले असे सांगितले. त्यावर मंडल अधिकारी सरवदे यांनी मग एवढ्यावेळ बसण्याऐवजी घेऊन यायच होत असे म्हणून लाचेची मागणी केली. त्यावर तक्रारदार यांनी नाय येतो की लगेच येतो. ती तुमच काम चालू असल्यामुळ बोललो नाही ओ.. पुढ माणस होती त्यामुळ मी काय बोललो नाही.. परत तुम्ही म्हणणार सगळ्यादेखत बोलायलागला.. म्हणून काय बोललो नाही असे म्हणाले. त्यानंतर काहीवेळ चर्चा करून तक्रारदार रोंगे यांनी येतो साहेब ..अर्ध्या तासात येतो मग वीस हजार घेऊन असे म्हणाले. त्यावेळी मंडल अधिकारी सरवदे यांनी त्यांची मान हालवून होकारार्थी इशारा केला. त्यानंतर आम्ही पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलो, अशी हकिकत सांगितली.

त्यानंतर आम्ही तक्रारदार रोंगे यांना ते पंचासह मंडल अधिकारी सरवदे यांना भेटण्यास गेल्यानंतर काय घडले याची हकिकत सांगण्यास सांगितले असता, त्यांनी देखील वरीलप्रमाणे घडलेली हकीकत सांगितली. त्यानंतर आम्ही व्हॉईसरेकॉर्डर लॅपटॉपला जोडून पाहिले असता, मेमरीकार्डमधील रेकॉर्डींग फाईलमधील संभाषण ऐकले असता वरीलप्रमाणे संभाषण झाल्याचे दिसून आले. यादरम्यान दि.19/11/2025 रोजीच्या पडताळणीवेळी खाजगी इसम तुकाराम आसबे यांनी तक्रारदार यांच्याकडे मंडल अधिकारी सरवदे यांच्याकरीता लाचेची मागणी केली होती, त्यामुळे ते रायगड भवन येथे उपस्थित होते का याबाबत आम्ही तक्रारदार यांना विचारले असता, तुकाराम आसबे हे रायगड भवन येथे कोठेही दिसून आले नाहीत असे त्यांनी सांगितले.

एकंदरीत दि.08/12/2025 रोजी करण्यात आलेल्या पडताळणी दरम्यान मंडलअधिकारी दिलीप सरवदे यांनी तक्रारदार यांचे शासकीय कामासाठी त्यांच्याकडे 20,000/- रू लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे त्यांच्याविरूध्द सापळा कारवाई करण्याचे ठरविले. त्यानंतर आम्ही अंमलदारांना शासकीय वाहनाजवळ बोलावून घेतले आणि तक्रारदार यांच्या तक्रारीची माहिती देऊन झालेल्या पडताळणीबाबत माहिती दिली आणि त्याअनुषंगाने सापळा कारवाई करावयाचे असल्याचे सांगितले. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना दोन्ही पंचांसमक्ष लाच रक्कम हजर करणेस सांगितले असता तक्रारदार यांनी 500/- रू दराच्या 40 चलनी नोटा एकूण रक्कम 20,000/- रुपये हजर केले. पोकॉ/766 किणगी यांनी सदर नोटा एका कागदावर लिहून काढले. त्यावर आम्ही व पंचांनी सहया करून तो कागद माझ्याकडे सुरक्षित ठेवला. त्यानंतर आम्ही तक्रारदारास व पंचांना अँन्थ्रासीन

पावडरचे गुणधर्म समजावून सांगून शासकीय वाहनामध्ये कृत्रीम अंधार करून प्रात्यक्षिक दाखिवले. त्यानंतर आमच्या सुचनेवरून चालक पोहेकॉ/984 गायकवाड यांनी कापसाच्या बोळयाने प्रत्येक चलनी नोटांच्या दोन्ही बाजूस अँन्थ्रासीन पावडर लावली व त्यानंतर त्यांनी सदर लाचेची रक्कम तक्रारदार रोंगे यांच्या अंगातील शर्टाच्या वरील डाव्याबाजूच्या खिशात ठेवले. त्यानंतर पोहेकॉ/984 यांनी त्यांचे हात स्वच्छ धूवून घेतले. त्यानंतर त्यांनी नोटांना अँन्थ्रासीन पावडर लावले असल्याने त्यांना सापळा कारवाईवेळी शासकीय वाहनातच थांबण्याच्या सुचना दिल्या. त्यानंतर आम्ही पंचांना, तक्रारदार व पोलीस पथकातील अंमलदार यांना सापळा कारवाईचे आयोजन करण्यात येत असल्याचे सांगून त्यांना योग्य त्या प्रमाणे सूचना दिल्या तसेच सापळा कारवाई यशस्वी झाल्यास लोकसेवकाची "अंगझडती व लाचेची रक्कम" जप्त करण्याच्या कारवाईचे चित्रीकरण पोना/30 नरोटे हे त्यांचेकडील मोबाईलमध्ये करणार असल्याचे सांगितले.

त्यानंतर आम्ही तक्रारदार रोंगे व दोन्ही पंचाचे निवेदने व्हाईस रेकॉर्डरव्दारे ध्वनिमुद्रीत करून घेतले ती वेळ 17:34 वा ची होती. सदरचे निवेदन घेताना त्याचे व्हिडीओ रेकॉर्डीग करणेत आलेले आहे.

त्यानंतर मंडल अधिकारी सरवदे यांनी मागणी केलेली लाच रक्कम देणेकरीता तक्रारदार रोंगे यांना व्हॉईस रेकॉर्डर 17:41 वा. चालू करुन त्याचे शर्टाच्या आत असलेल्या बनीयनच्या आतील बाजूस गळयात अडकावून शासकिय पंच क्र.1 गंदम यांचेसह तक्रारदार यांचेकडील मोटारसायकलवरून रायगड भवनकडे रवाना केले. त्यांचे पाठोपाठ आम्ही सापळा पथकातील सर्वजण शासकिय वाहन क्र. एम.एच. 12 यु.सी. 4108 या मधून रवाना झालो. तक्रारदार व पंच क्र.1 दोघे रायगड भवन येथे जाऊन त्यांचे मोटारसायकल लावून कार्यालयात गेले, त्यावेळी आम्ही तहसिल कार्यालयाच्या समोर शासकीय वाहन थांबवून वाहनातून उतरून रायगड भवन येथे गेलो, सदरवेळी तक्रारदार हे फोनवर बोलत आमच्या समोरून परत निघाले. यादरम्यान तक्रारदार यांनी आम्हास इशारा करून त्यांच्यामागे येण्यास सांगितले. त्यानंतर तक्रारदार व पंच दोघे पुन्हा त्यांचे मोटारसायकलवर बसून उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयाच्या बाजूच्या रस्त्याने निघाले. त्यावेळी सापळा पथकातील आम्ही सर्वजण शासकीय वाहनात बसून तक्रारदार यांच्या मोटारसायकलच्या पाठीमागे निघालो. तक्रारदार हे नवीन बसस्टॅन्डमार्गे के.बी.पी कॉलेज चौकात जाऊन थांबले. त्यावेळी आम्ही शासकीय वाहनाने त्यांच्या पाठीमागे जाऊन तिथे थांबलो. यादरम्यान तक्रारदार रोंगे हे पुन्हा त्यांच्या मोबाईलवरून बोलताना दिसून आले. त्यानंतर काहीवेळातच एक इसम त्यांचे मोटारसायकलवरून तक्रारदार रोंगे यांच्याजवळ येऊन चर्चा करून माळशिरसकडे जाणाऱ्या रस्त्याने निघाले. सदर इसमाच्या पाठीमागे तक्रारदार रोंगे व पंच क्र.1 गंदम हे निघाले. त्यावेळी आम्ही शासकीय वाहनाने त्यांच्या पाठीमागे निघालो. तक्रारदार रोंगे व पंच गंदम तसेच मोटारसायकलवरील इसम हे दोघे इसबावीच्या दिशेने पुढे जाऊन रस्त्याच्याकडेला असलेल्या एका चहा टपरीवर थांबले. त्यावेळी आम्ही शासकीय वाहन काही अंतरावर थांबवून वाहनातून उतरून चहा टपरीच्या आसपास सापळा लावून थांबून राहिलो. यादरम्यान चालक पोहेकॉ/984 गायकवाड हे वाहनातच थांबून राहिले. तक्रारदार, पंच व मोटारसायकलवरील इसम हे टपरीजवळ जाऊन चहा घेऊन तिथे असलेल्या बाकड्यावर बसले. त्यांच्यादरम्यान काहीवेळ चर्चा झाल्यानंतर सदर इसमाने तक्रारदार रोंगे यांच्याकडून लाचेची रक्कम घेऊन त्यांच्याकडील कापडी पिशवीमध्ये ठेऊन घेतले. यावेळी तक्रारदार यांनी त्यांच्या डोक्यावरून हात फिरवून लाच स्विकारलेचा इशारा दिल्याने आम्ही

सदर ठिकाणी जाऊन त्या इसमास ताब्यात घेतले. त्यानंतर पोकॉ/766 किणगी यांनी तक्रारदार रोंगे यांच्या गळ्यातील व्हाईसरेकॉर्डर बंद करून त्यांच्या ताब्यात ठेऊन घेतला. ती वेळ 18.18 वा ची होती. यावेळी पंच क्र.1 गंदम यांनी सदर इसम मंडलअधिकारी सरवदे असल्याचे सांगितले.

त्यानंतर पोना/30 नरोटे यांनी त्यांचे मोबाईलवरून सदर घटनेचे व्हिडीओ रेकॉर्डीग सुरू केले. त्यानंतर पोलीस उपअधीक्षक श्री चौगुले यांनी मंडल अधिकारी सरवदे यांना त्यांची स्वत:ची, पोनि लांभाते व सापळा पथकाची ओळख करून दिली. त्यानंतर आम्ही दोन्ही पंचास त्यांचे नाव व पद सांगण्यास सांगितलेवरून त्यांनी त्यांचे नाव व पद याबाबत मंडल अधिकारी सरवदे यांना माहिती दिली. त्यानंतर पोलीस उपअधीक्षक श्री चौगुले यांनी त्यांच्याविरूध्द झालेल्या कारवाईबाबत थोडक्यात माहिती दिली. त्यानंतर पोलीस उपअधीक्षक श्री चौगुले यांनी मंडल अधिकारी सरवदे यांना त्यांचे नाव विचारता त्यांनी त्यांचे नाव दिलीप दिगंबर सरवदे, वय - 56 वर्षे, पद मंडल अधिकारी, मुळ रा. मु.पो बाभूळगाव, ता. पंढरपूर, जि. सोलापूर, सध्या रा. 14, सुजय नगर, वाघ यांच्या घरी भाड्याने, अकलूज, ता. माळशिरस, जि. सोलापूर असे सांगीतले. त्यानंतर आम्ही मंडल अधिकारी सरवदे यांना लाच रक्कम कुठे ठेवली आहे याबाबत विचारले असता त्यांनी त्यांच्याकडील आकाशी निळ्या रंगाची पिशवीमध्ये ठेवल्याचे सांगितले, त्यानंतर पंच क्र.2 करगुळे यांनी आमच्या सुचनेवरून लाच रक्कम पिशवीमधून काढून त्यांच्या ताब्यात घेतले. त्यानंतर आम्ही नोटांचे क्रमांक लिहून ठेवलेला कागद पंच क्र.2 करगुळे यांच्याकडे देऊन मिळून आलेल्या नोटांचे क्रमांक तपासण्यास सांगितले असता, मंडल अधिकारी सरवदे यांच्या ताब्यातून मिळून आलेल्या नोटांचे क्रमांक व यापुर्वी सापळापुर्व कारवाईदरम्यान लिहून घेतलेल्या नोटांचे क्रमांक सारखेच असल्याचे दिसून आले. यादरम्यान सायंकाळची वेळ असल्याने अंधार झालेला होता. यावेळी मंडल अधिकारी सरवदे यांनी स्विकार केलेली लाच रक्कम अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात तपासण्याकरीता आम्ही पोकॉ/766 किणगी यांना सांगितले. त्यानुसार त्यांनी अल्ट्राव्हायलेट दिवा चालू करून पंचासमक्ष व आमच्या समक्ष मंडल अधिकारी सरवदे यांच्या ताब्यातून मिळून आलेल्या नोटांची पाहणी केली असता, त्यावर निळ्या रंगाची चकाकी दिसून आली. त्यानंतर मंडल अधिकारी सरवदे यांच्याकडील पिशवी व त्यामधील स्वेटरची अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात तपासणी केली असता त्यावरदेखील निळ्या रंगाची चकाकी दिसून आली. त्यानंतर आम्ही सदर ठिकाणी सर्व प्राथमिक तपासण्या पुर्ण करून शासकीय विश्रामगृह पंढरपूर येथे आलो.

शासकीय विश्रामगृह पंढरपूर येथे आल्यनंतर आम्ही पंच क्र.1 गंदम यांना सापळा कारवाईवेळी मंडलअधिकारी सरवदे यांची भेट घेण्यासाठी गेल्यानंतर काय घडले हे आमच्या समक्ष पंच क्र.2 यांना सांगा असे म्हणालो असता त्यांनी सांगितले की, "मी व तक्रारदार रोंगे दोघे मोटारसायकलवरून रायगड भवन येथे गेलो. त्याठिकाणी मंडल अधिकारी सरवदे हे दिसून न आल्याने तक्रारदार रोंगे यांनी त्यांचे मो.क्र. 9860321139 यावरून मंडल अधिकारी सरवदे यांचे 8421978996 यावर फोन केला आणि त्यांचे फोन स्पिकरवर ठेवले. त्यावेळी तक्रारदार यांनी हा साहेब आलतो बंद हाय ओ असे म्हणाले. त्यावर मंडल अधिकारी सरवदे यांनी फार वेळ लावला तुम्ही असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी अरेच्चा.. मी आलो आता कुलूप दिसल म्हणून म्हणल तुम्हाला फोन तर करावा तुम्हाला.. कुठाय आता.. पंढरपूरातच हाय ना असे विचारले. त्यावर सरवदे यांनी कॉलेज चौकाकड आलो असे सांगितले. त्यावर तक्रारदार यांनी येऊ का तिकड असे विचारले असता सरवदे यांनी बर

या असे म्हणून तिकडे येण्यास सांगितले. त्यामुळे आम्ही पुन्हा मोटारसायकलवरून कॉलेज चौकामध्ये गेलो. त्यानंतर तक्रारदार रोंगे यांनी पुन्हा तक्रारदार यांना फोन केला आणि त्यांचा फोन स्पीकरवर ठेऊन कॉलेज चौकात आलोय म्हणल कुठाय साहेब असे सरवदे यांना विचारले. त्यावर त्यांनी ती इथ हाय मी.. प्लाझाच्या इथ असे सांगितले. यानंतर काहीवेळ चर्चा झाल्यानंतर मंडल अधिकारी सरवदे हे त्यांचे बजाज प्लॅटिना, रजि. क्र. एम.एच.13 डी.जे. 2014 या मोटारसायकलवरून आमच्याजवळ आले. त्यावेळी तक्रारदार यांनी चहा घेऊ की असे म्हणाले असता सरवदे यांनी चला असे म्हणाले. त्यानंतर आम्ही मोटारसायकलवरून पंढरपूर माळशिरस रोडवरील इसबावी परिसरातील रस्त्याच्या कडेला असलेल्या सोमनाथ टि या चहा टपरीजवळ थांबलो. यावेळी तक्रारदार यांनी पाणी व चहा घेतले. यावेळी मी चहा पित नसल्याने बाजूलाच उभारलो. यादरम्यान तक्रारदार रोंगे व सरवदे यांनी चहा पिऊन झाल्यानंतर पुन्हा मोटारसायकलकडे येऊन उभारले. यावेळी सरवदे यांनी त्यांच्या हातामधील पिशवी दाखवून माझे नाय ह्याच्यात टाका.. हे ह्याच्यात टाका.. खाली टाका असे म्हणून लाच रक्कम त्यांच्या पिशवीमध्ये ठेवण्यास सांगितले. त्यावेळी तक्रारदार रोंगे यांनी त्यांच्या शर्टाच्या वरील बाजूच्या खिशात अँन्थ्रासीन पावडर लावून ठेवलेली लाच रक्कम उजव्या हाताने काढून सरवदे यांच्या पिशवीमध्ये ठेवले. त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांचे हात डोक्यावरून फिरवून लाच स्विकारलेचा इशारा दिला. त्यावरून त्यांना ताब्यात घेण्यात आले अशी हकिकत सांगितली. त्यानंतर तक्रारदार यांना घडलेल्या घटनेबाबत विचारले असता त्यांनी सुध्दा पंच क्र.1 गंदम यांचे सांगणेप्रमाणे हकिकत सांगितली. यानंतर आम्ही व्हॉईसरेकॉर्डर लॅपटॉपला लावून झालेले संभाषण ऐकले. त्यामध्ये वरीलप्रमाणे संभाषण झाल्याचे दिसून आले. त्यानंतर सविस्तर पडताळणी, सापळापुर्व व यशस्वी सापळा पंचनामा हे शासकीय विश्रामगृह पंढरपूर येथे करण्यात आले.

तरी दि.18/11/2025 रोजी तक्रारदार श्री सुर्यकांत मुरलीधर रोंगे यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दि.18/11/2025 रोजीचे 16.28 ते दि.19/11/2025 रोजीचे 16.50 आणि दि.08/12/2025 रोजीचे 15.27 ते 18.18 या दरम्यान रायगड भवन, पंढरपूर तहसिल कार्यालयाच्या पाठीमागे व सोमनाथ टी कॅन्टीन, पंढरपूर माळशिरस रोड, इसबावी पंढरपूर या ठिकाणी लोकसेवक दिलीप दिगंबर सरवदे, वय - 56 वर्षे, पद मंडल अधिकारी, मुळ रा. मु.पो बाभूळगाव, ता. पंढरपूर, जि. सोलापूर, सध्या रा. 14, सुजय नगर, वाघ यांच्या घरी भाड ाने, अकलूज, ता. माळशिरस, जि. सोलापूर व खाजगी इसम तुकाराम आसबे (पुर्ण नाव व पत्ता माहित नाही) यांनी तक्रारदार रोंगे यांचे मौजे खर्डी येथील गट नं.1066/1 येथे त्यांचे व त्यांच्या पत्नीच्या नावे असलेले शेतजमीन बिनशेती करण्याकरीता त्यावर भूसंपादन नसलेबाबतचा दाखला आवश्यक असल्याने तसा दाखला मिळणेकरीता उपविभागीय अधिकारी, पंढरपूर यांच्या कार्यालयात केलेल्या अर्जाची चौकशी करून तहसिल कार्यालयास अहवाल देण्याकरीता तडजोडीवरून 20,000/- रू लाचेची मागणी करून दि.08/12/2025 रोजी लोकसेवक दिलीप दिगंबर सरवदे यांनी स्वत: पंचासमक्ष स्विकारले आहे. अशा प्रकारे आरोपी लोकसेवक क्र.1 दिलीप दिगंबर सरवदे, वय - 56 वर्षे, पद मंडल अधिकारी यांनी सार्वजनिक कर्तव्य करण्यासाठी कायदेशीर परिश्रमाखेरीज अन्य पारितोषण म्हणून तक्रारदार यांच्याकडे 20,000/- रू लाचेची मागणी करुन सदर लाच रक्कम स्वत: स्विकारून तसेच आरोपी क्र.2 खाजगी इसम तुकाराम आसबे यांनी त्यांच्या वैयक्तिक प्रभावाचा वापर करून तक्रारदार यांचे काम लोकसेवकामार्फतीने करून घेण्याकरीता तक्रारदार यांच्याकडे आरोपी लोकसेवक सरवदे यांचेनावे 20,000/- रू लाचेची मागणी करून गुन्हेगारी

स्वरूपाचे वर्तन केले आहे म्हणून मी भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 चे कलम 7, 7-अ प्रमाणे सरकारतर्फे कायदेशिर फिर्याद देत आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब माझे सांगणे प्रमाणे टंकलिखीत करण्यात आला असून तो मी वाचून पाहीला असून बरोबर आहे.

हा फिर्यादी जबाब दिला.

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

**(1)** **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** vishvjeet bhagvanrao ghodke (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

**(2)** **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** **Rank (हुद्दा):**

**No. (क्र.):** **to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3)** **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):** **or (किंवा)**

**(4)** **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):** **on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** vishvjeet bhagvanrao ghodke

**14.**

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

**Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

**Rank (हुद्दा):** I (Inspector)

**No. (क्र.):** DCPS15101000402VBGM8101J

**15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्‌दा क्र. ७ ला जोडपत्र)**

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / seen )**
**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्‍ या/पाहिलेल्‍ या) शारीरिक वैशिष्‍ टये, व्‍ यंग आणि इतर तपशील)**

| S. No. (अ.क्र) | Sex (लिंग) | Date / Year Of Birth (जन्‍ मतारीख वर्ष) | Build (बांधा) | Height (cms) (उंची(से.मी) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्‍ या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | 1969 | | - | | चेचक: क्र. |
| 2 | पुरुष | | | - | | चेचक: क्र. |

| Deformities / Peculiarities (व्‍ यंग वैशिष्‍ टये) | Teeth (दात) | Hair (केस) | Eye (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit (s) (पोषाखाच्‍ या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language/Dialect (भाषा/बोली) | Place of (चे ठिकाण) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्‍ याच्‍ खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्‍ यापेक्षा अधिक तपशील दिल्‍ यास फक्‍ त यातील रकान्‍ यांची नोंद घेतली जाईल)**